जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUN 2017
सकाळ

# प्रा. विश्वास देशमुख यांचा मंगळवारी सत्कार

कोल्हापूर, ता. २५ : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाच्या गवई गटाचे जिल्हाध्यक्ष दलितमित्र प्रा. विश्वास देशमुख यांचा मंगळवारी (ता. २७) रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय नेते डॉ. राजेंद्र गवई यांच्या हस्ते नागरी सत्कार होणार आहे. शाहू स्मारक भवनात दुपारी १२ वाजता कार्यक्रम होईल. या वेळी 'समतेची राष्ट्र निर्मिती आणि आंबेडकरी चळवळीचे योगदान' या ग्रंथाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

डॉ. देशमुख गेली ३५ वर्षे आंबेडकरी चळवळीत काम करतात. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया गवई गटातर्फे विविध सामाजिक विषयावर मोर्चे, आंदोलन त्यांनी केली. त्यातून सामान्यांच्या हितरक्षणाचे काम केले आहे. याशिवाय चर्चासत्र, परिसंवाद, परिषद याद्वारे सामाजिक प्रबोधनाचा जागर त्यांनी घडविला आहे. त्यांच्या कार्याचा आढावा घेणाऱ्या गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील विविध पक्षांचे आमदार, माजी मंत्री, नेते उपस्थित रहाणार आहेत, अशी माहिती निमंत्रक भाऊसाहेब काळे यांनी आज येथे दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUN 2017
पुढारी

## हर्षदा गायकवाड बी.ए.च्या परीक्षेत शिवाजी विद्यापीठात प्रथम

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च २०१७ मध्ये झालेल्या बी.ए. पदवी परीक्षेत हर्षदा गायकवाड हिने ८६.२७ टक्के गुणांसह विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक मिळविला. ती राजाराम महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. प्राचार्य डॉ. शांताराम बुटे, भूगोल विभागप्रमुख डॉ. के. ए. माळी, भूगोल विभागाचे प्राध्यापक डॉ. आर. एस. शिकलगार, प्राध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले.